# पोदार महाविद्यालयात स्वसंरक्षणाचे धडे

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

माटुंग्याच्या पोदार कॉलेजने विद्यार्थिनी आणि शिक्षिकांसाठी स्वसंरक्षणाचे धडे देण्याचा उपक्रम सुरू केला. २३ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या उपक्रमात पोदार जिमखाना आणि पोदार ज्युडो क्लब यांच्या सहकार्याने टप्प्याटप्प्याने हे स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे ज्युडो खेळाडू आणि भारताचे पहिले आंतरराष्ट्रीय पंच म्हणून काम करणाऱ्या रवींद्र पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे धडे दिले.

बदलापूर शाळेतील लैंगिक शोषणाच्या प्रकरणानंतर महिला आणि खासकरून विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने शिक्षणसंस्थांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्याबाबतही निर्देश दिले आहेत. हीच बाब ध्यानात ठेवत पोदार महाविद्यालयाने टप्प्याटप्प्यांत स्वसंरक्षणाची कार्यशाळा आयोजित केली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. सोहनलाल जैन यांच्या संकल्पनेला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शोभना वासुदेवन यांनी मूर्त आकार दिला आणि जिमखान्याच्या प्रभारी डॉ. वृषाली कणेरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा सुरू आहे.

एखाद्या व्यक्तीने हल्ला केला, तर स्वतःचा बचाव कसा करायचा, मागून हल्ला झाला, तर काय करायचे, गळा दाबला, तर कशी सुटका करायची, अशा अनेक गोष्टींचे तंत्र यावेळी रवींद्र पाटील यांनी विद्यार्थिनींना दिले. पाटील हे पोदार कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. धोकादायक परिस्थितीत प्रसंगावधान राखून कसे काम करायचे, याची शिकवण मुलींवर बिंबवण्याचा प्रयत्न त्यांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून केला. हात, कोपर, बोटे यांचा वापर शस्त्रासारखा करता येतो, असेही त्यांनी सांगितले.

A Self Defence Workshop is being organised in R. A. Podar College of Commerce & Economics (Empowered Autonomous) from 23rd September 2024 for the girl students and the female teaching and non-teaching staff by Podar Gymkhana and Podar Judo Club.

The news is covered by Maharashtra Times on 17th September 2024